धावते नवनगर 21-9-14

## सुधागडमधील श्रमिक नारी संघातर्फे सुरू झालेल्या व्यवसायाचे महिला गृहउद्योगात रूपांतर

# ग्रामीण भागातील महिलांनी बनविलेल्या उत्पादनांना देशभर मागणी

पाली । प्रतिनिधी

सुधागड तालुक्यात परळी घोटावडे येथे दहा वर्षांपूर्वी श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर प. पू. प्रविण मेहता यांच्या प्रेरणेने सुरू झाले. स्वत:ची परिपूर्ती आत्मज्ञानाने कशी प्राप्त करून घेता येते याचे संशोधन व साध्य असा या आश्रमामगील हेतु होता. याबरोबरच ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी त्यांना काम उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेतून श्रमिक नारी संघाची स्थापना करण्यात आली होती. सुरूवातीस दोन महिलांच्या माध्यमातून गुजराथी आहारातील खाकरा पदार्थ बनविण्याचे कामास सुरूवात झाली. आज या व्यवसायाचे रूपांतर महिला गृहउद्योगात होत आहे याचा आनंद सर्वांना होत आहे, असे प्रतिपादन श्रमिक नारी संघाच्या संचालिका सिमी थापर यांनी केले.




महिला गृहउद्योगाचे उद्घाटन प.पु.पप्पाजींच्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बीपीन बाविसी व निशा बाविसी यांच्या हस्ते करण्यात आले. यावळी श्रमिक नारी उद्योग समुहाच्या संचालिका सिमी थापर, मिता हेमाणी, पुनिता अजमेरा, शिल्पा शहा, श्रुती शेठ, प्राणलाल शहा, बीनीन सावला या मान्यवरांसह आश्रमाचे अनेक मुमुक्षु यावेळी उपस्थित होते. महिला गृह उद्योगाच्या उत्पादनांचे ब्रॅन्ड नेम चाक्रि असे ठेवण्यात आले आहे. चाक्रि म्हणजे सेवा असा अर्थ होतो. या उद्योगात दिवाळी करिता लागणारे विविध दिवे, सुकामेवा पॅकिंग, चॉकलेट पॅकिंग आणि विविध चवीचे खाकरे असे उत्पादन महिला उद्योगात घेतले जात आहे. आज सुमारे पन्नास महिला या उद्योगात श्रमिक नारी संघाच्यावतीने काम करीत आहे. ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना काम शिकवून त्यांना रोजगाराची संधी आणि आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीचा प्रयत्न श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर च्या माध्यमातून केला जात आहे.

आदिवासी व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गटातील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळावे म्हणून आश्रमातर्फे बालवाडीपासून इंग्रजी माध्यमाची शाळा काढण्यात आली. वीस मुलांच्या उपस्थितीपासून सुरूवात झालेल्या या शाळेत आज चारशे पन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहे. या शैक्षणिक उपक्रमाचे प्रमुख डॉ. जोशी यांचा आचार्य पप्पाजींच्या हस्ते गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातून या विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी साठी स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला गृहउद्योगातील महिलांसाठी स्वतंत्र बसची व्यवस्था करण्यात आली. या नव्या बसचे उद्घाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

■ अत्यंत दुर्गम भाग असलेल्या या वाडयापाडयांत आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने आश्रमामार्फत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला होता. याला मिळालेला प्रचंड प्रतिसाद बघता परळी येथे क्लिनिक उघडण्यात आले. यात मुंबईतील नामांकित डॉक्टर कान, नाक घसा, त्वचा रोग, श्वसनरोग असे विविध आजारांवरील सेवा देण्याचे काम करीत आहेत. तालुक्यात सर्व सोयींनी युक्त असे मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमातर्फे सुरू करण्यात येणार आहे. अशी माहिती यावेळी डॉ. हरेश ग्रोशर यांनी दिली.